## नियमित फौजदारी खटला क्र. ७४/२०१७
## निशाणी ६६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज आरोपी क्र. ६ तर्फे केस स्वतंत्ररित्या चालविण्याकरीता दाखल करण्यात आला आहे.

२. आरोपी क्र. ६ चे अर्जात कथन की, प्रस्तुत केस आरोपींविरूद्ध भा.द.वि. कलम ३४१,१४३,१४७,१४९ व मुं.पो.का. कलम ३७(१)(३)/१३५ प्रमाणे दाखल आहे. सदरच्या केसमध्ये एकूण १९ आरोपी आहेत. सदरचे आरोपी केस दाखल झाल्यापासून/सन २०१६ पासून कोर्टात हजर राहत नाहीत. आरोपींना समन्स/वॉरंट काढूनही त्याचे रिपोर्टस् केस सोबत आढळून ययेत नाहीत. त्यामुळे सदरची केस मागील ७ वर्षांपासून प्रलंबित आहे.

३. आरोपीचे शिक्षण बी.ए., हॉटेल मॅनेजमेंट असे झाले असुन त्याने सिंगापुर येथे ७ ते ८ महीने नोकरी केली आहे व त्यानंतर कोव्हिड १९ च्या प्रार्दुभावामुळे त्याला घरी यावे लागले.

४. आरोपीला नोकरीकरीता युरोपमध्ये जायचे आहे. त्यासाठी त्याला पासपोर्टची आवश्यकता आहे. त्याचेवर केस असल्याने पासपोर्ट मिळण्यास अडचण येत आहे.

५. सर्व आरोपी हजर झाल्याशिवाय सदर केसचे कामकाज चालणार नाही. त्यामुळे सदर आरोपी क्र. ६ विरूद्ध केसची स्वतंत्र सुनावणी होणे आवश्यक आहे. तरी, आरोपी क्र. ६ विरूद्ध केस स्वतंत्र चालविण्यात यावी अशी या आरोपीची मागणी आहे.

६. सदरहू अर्जावर विद्वान सरकारी वकीलांनी म्हणणे सादर केले की, आरोपीच्या अर्जातील मुद्दा क्र. ३ ची मागणी संदर्भात न्यायालयाने निशाणी ६९ वर विस्तृत आदेश पारीत केला आहे. सदर प्रकरण सन २०१६ चे असुन सदर प्रकरणात एकूण १९ आरोपी आहेत. त्यापैकी उर्वरीत १८ आरोपी जामीन दिल्यानंतर हजर नसल्याचे रोजनाम्यावरून दिसुन येते. ते वारंवार गैरहजर असल्याचे प्रकरणाचे अवलोकन केले असता दिसुन येते. आरोपी क्र. १ ते ५ आणि क्र. ७ ते १९ यांना अजामिनपात्र वॉरंट काढण्याचे आदेश पारीत करण्यात यावेत. सदर आरोपींना हजर करून घेवून प्रकरण पुढे चालविण्यात यावे.

**७.** वरीलप्रमाणे सर्व परिस्थितीचा विचार करता आरोपी क्र. ६ हा न्यायालयात हजर राहण्यास व काम चालविण्यास तयार असल्याने इतर आरोपींच्या अनुपस्थितीमुळे त्याचा खटला प्रलंबित राहणार आहे. त्यामुळे आरोपी क्र. ६ चा दोषारोप स्वतंत्र निश्चित करून इतर आरोपींविरूद्ध वॉरंटचा आदेश करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :—

## आदेश

**१.** आरोपी क्र. ६ विरूद्ध खटला स्वतंत्रपणे चालविण्यासाठी आरोपी क्र. १ ते ५ आणि क्र. ७ ते १९ यांच्यापासून वेगळा करण्यात येतो.

**२.** आरोपी क्र. १ ते ५ आणि क्र. ७ ते १९ यांच्याविरूद्ध अजामिनपात्र वॉरंट काढण्यात यावे.

सही/—
(**श्रीमती एस.एस. देशमुख**)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
सिन्नर

ठिकाण : सिन्नर
दिनांक : १०.११.२०२३